मुं. गृ. नि. ... मंडळ
क्र. सभा.१८८
दिनांक २३/१२/१९

सभापती
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
तिसरा मजला, गृहनिर्माण भवन
मुंबई ४०० ०५१. दुरध्वनी क्र.६६४०५३५४

---

जा.क्र.सभापती/मुं.मं./८६५/२०१९ — दि. २१/१२/१९

इतिवृत्त

**विषय :- बी.डी.डी.चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीबाबत आढावा बैठक.**

बुधवार दि.१८/१२/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.सभापती / मुंबई मंडळ यांचे अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीस मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी, सहमुख्य अधिकारी, कार्यकारी अभियंता / बी.डी.डी.व उपअभियंता / बी.डी.डी., उप समाजविकास अधिकारी / बी.डी.डी.(ना.म.जोशी मार्ग) इत्यादि अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये बी.डी.डी.चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीबाबत आढावा घेण्यात आला.

<u>बी.डी.डी.चाळ, ना.म.जोशी मार्ग :-</u>

१] <u>पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यातील चाळीतील भाडेकरू वगळता चोळ परिसरातील ७७ स्टॉल व झोपडीधारकांची पात्रतेबाबतची कार्यवाही</u> :- माहे मे २०१८ मध्ये सदर स्टॉल व झोपडीधारकांचे सर्वेक्षण केले असून उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) / कुलाबा विभाग यांचेमार्फत पात्रतेबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदरील पात्रता कार्यवाही दि.२६/१२/२०१९ पुर्वी पूर्ण करण्याबाबत उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) / कुलाबा विभाग यांनी कार्यवाही करावी, असे मा.सभापती महोदयांनी निर्देश दिले.

२] <u>पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यातील संक्रमण गाळयात स्थलांतरीत झालेल्या लाभार्थ्यांची मालकी हक्काने देण्यात येणा-या पुनर्वसन गाळयांची सोडत काढणे</u> :- दि.२५/११/२०१९ पर्यत पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यातील एकूण २३७ लाभार्थी संक्रमण गाळयात स्थलांतरीत झाले असून याबाबतची लाभार्थ्याची व पुनर्वसन गाळयांची माहिती, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी, म्हाडा यांना सोडत कार्यवाहीसाठी देण्यात आली आहे. सोडतीकरिता तीन सदस्यीय [ओव्हरसाईट कमिटी] समितीची स्थापना केलेली आहे. ओव्हरसाईट समिती समोर सोडत प्रणालीचे सादरीकरण झाल्यानंतर पुनर्वसन गाळयाबाबत सोडतीचा दिनांक निश्चित करण्यात येईल. सदरील सोडत कार्यवाही (Lottery Process) त्वरीत करण्याबाबत उपमुख्य अधिकारी [पणन] / मुं.मं. यांनी पुढील कार्यवाही युध्दपातळीवर करावी असे निर्देश मा.सभापती महोदयांनी दिले.

:- पुनर्वसन सदनिकेचा गाळा सोडत काढल्यानंतर नोंदणीकृत करण्यासाठी नोंदणी महानिरीक्षक, जिल्हा मुद्रांक अधिकारी व NIC विभागास संक्रमण गाळयाचा करारनामा नोंदणीकृत करण्यासाठी जशी कार्यप्रणाली म्हाडास उपलब्ध करुन देण्यात आली त्याप्रमाणे पुनर्वसन गाळयांसाठी ऑनलाईन नोंदणीकृत कार्यप्रणाली प्रकल्प जागेवर उपलब्ध करुन

EE/BDD कार्यवाहीसाठी सदर इतिवृत्त सर्व संबंधितांना पाठवावे

देण्याबाबत कळविण्यात आले असून अद्याप मंजूरी अप्राप्त आहे. या प्रकरणी आवश्यक पाठपुरावा करण्यात यावा, असे निर्देश दिले.

३] <u>लाभार्थ्यांना संक्रमण गाळयात स्थलांतरणाच्या कार्यवाहीस गती देण्याबाबत</u> :- वेळोवेळी SMS द्वारे, नोटीस प्रसिध्दी पत्रकाद्वारे लाभार्थ्यांना संक्रमण गाळयाचा ताबा घेवून जुन्या चाळीतील गाळा पुनर्वसनासाठी हस्तांतरीत करण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. तसेच संक्रमण गाळयात स्थलांतरीत होणा-या लाभार्थ्यांच्या पुनर्वसन गाळयाबाबत सोडत काढण्यात येईल, असे रहिवाशांना सुचित करण्यात आले आहे. संक्रमण गाळयांचे वितरण आदेश पारित करण्यात आलेल्या ४०० लाभार्थ्यांपैकी दि.२५/११/२०१९ पर्यत २३७ लाभार्थी संक्रमण गाळयात स्थलांतरीत झाले आहेत. तसेच २९८ लाभार्थ्यांनी संक्रमण गाळयाचा करारनामा नोंदणीकृत केला आहे. संक्रमण गाळयाचा करारनामा लाभार्थ्यासोबत करण्याच्या कार्यवाहीस गती मिळण्यासाठी आवश्यक प्रयत्न उपमुख्य अधिकारी [पणन] उप अभियंता, श्री.भडांगे व उप समाज विकास अधिकारी, श्री.भिसे यांनी करावे व या कार्यवाहीचे सह मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांनी संनियंत्रण करावे, असे मा.सभापती महोदयांनी निर्देश दिले. सदरील कार्यवाही चाळनिहाय पूर्ण करावी, जेणेकरुन एक चाळ पूर्णपणे रिक्त होऊन जमीनदोस्त करणे शक्य होईल, असे निर्देश मुख्य अधिकारी / मुं.मं. यांनी संबंधितांना दिले.

ना.म.जोशी मार्ग बीडीडी चाळीतील आज पर्यत पहिल्या टप्प्यातील २४६ भाडेकरुंचे संक्रमण शिबीरात स्थलांतर झाले आहे. उर्वरीत रहिवाशांचे लवकरच स्थलांतर करण्यात येणार असून सहकार्य न करणा-या १०० रहिवाशांना नोटीसा दिल्या आहेत. एकूण ६०७ पात्र लाभार्थ्यांपैकी २०७ लाभार्थी संक्रमण शिबीराबाबतचा वितरण आदेश व करारनामा स्विकारत नाहीत. ज्या लाभार्थ्यांनी संक्रमण शिबीरातील गाळा घेतलेला आहे व स्थलांतर केले नाही. याचा अर्थ असा होतो की, त्यांना संक्रमण गाळयात जाण्याचे स्वारस्य नाही. त्यामुळे १० दिवसात त्यांना देण्यात आलेल्या संक्रमण गाळयाचे वितरण रद्द करुन दुस-या लार्भार्थ्याला देण्यात येईल. अशा नोटीसा जारी करण्याबात मा.सभापती महोदयांनी निर्देश दिले.

४] <u>पुनर्वसन इमारतीचे बांधकाम सुरु करण्याबाबत</u> :- पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यातील सर्व ८०० लाभार्थ्यांची पात्रता प्रसिध्द झाल्यानंतर त्यांच्यासमवेत करारनामा करण्यात येईल. ८०० लाभार्थ्यांपैकी ६०७ लाभार्थ्यांची पात्रता झाली असून १९३ लाभार्थ्यांची पात्रता बाकी आहे. अशा १० चाळी, ८० स्टॉल / झोपडया, ५ मंदिरे यांचे स्थलांतरण होऊन सदर रिक्त बांधकामे व नागरी संरक्षण विभागाची भुमिगत पाण्याची टाकी तोडल्यानंतरच तांत्रिक दृष्टया पुनर्वसन इमारतींचे बांधकाम प्रत्यक्ष जागेवर सुरु करणे शक्य होईल, असे कार्यकारी अभियंता / बी.डी.डी./मुंबई मंडळ यांनी सांगितले.

५] <u>गिरण्यांच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या संक्रमण शिबीरात स्थलांतरीत झालेल्या सदनिकेबाबतच्या विविध तक्रारी</u> :- सदरील तक्रारींचे त्वरीत निराकरण होण्याबाबत कार्यकारी अभियंता / शहर विभाग / मुंबई मंडळ यांनी आवश्यक कार्यवाही करावी, असे मा.सभापती महोदयांनी निर्देश दिले.

**बी.डी.डी.चाळ, नायगाव :-**

नायगाव बी.डी.डी.चाळीतील १ल्या टप्प्याचे पात्रता सर्वेक्षण स्थानिक रहिवाशांच्या एका गटाच्या विरोधामुळे होऊ शकले नाही. त्यामुळे सक्षम प्राधिकारी यांनी ५व्या टप्प्यातील ५ चाळींबाबत पात्रता सवेक्षण पूर्ण केले असून २०४ लाभार्थ्यांची प्रारुप पात्रता यादी प्रसिध्द केली आहे. सदरील प्रकल्प जागेत फेब्रुवारी २०१८ नंतर कोणतेही प्रकल्प कामकाज होऊ शकले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

१ल्या टप्प्यातील पात्रता सर्वेक्षण कार्यवाही सुरु करण्याबाबत म्हाडाच्या वरिष्ठस्तरावर विचारविनिमय होऊन निर्णय घेण्यात यावा, असे निर्देश मा.सभापती महोदयांनी दिले.

**बी.डी.डी.चाळ, वरळी :-**

वरळी प्रकल्पाच्या १ल्या टप्प्यातील १४ चाळींबाबत पात्रता सर्वेक्षण पूर्ण झाले असून चाळ क्र.१०१ व १०२ बाबत प्रारुप पात्रता यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. उर्वरीत पात्रता कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या प्रकल्प जागेवर नमुना सदनिकेचे बांधकाम सुरु आहे व संक्रमण इमारतीचे बांधकाम सुरु करण्याबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

वरील तीनही प्रकल्पांबाबत देण्यात आलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन व्हावे.

उपस्थित मुंबई मंडळाच्या अधिका-यांचे आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे मा.सभापती महोदयांनी घोषीत करण्यात आले.

[मधु चव्हाण] 29/12
सभापती / मुंबई मंडळ

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-
१] मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ
२] उपमुख्य अभियंता / बी.डी.डी./ मुंबई मंडळ
३] सहमुख्य अधिकारी / मुंबई मंडळ
४] कार्यकारी अभियंता / बी.डी.डी./ मुंबई मंडळ
५] कार्यकारी अभियंता / शहर विभाग / मुंबई मंडळ
६] उपमुख्य अधिकारी [पणन] / मुंबई मंडळ
७] उपजिल्हाधिकारी / [अतिरिक्रमण/निष्कासन] / कुलाबा विभाग / धारावी विभाग / वांद्रे-२ विभाग
८] श्री.उत्तम भिसे, उप समाजविकास अधिकारी / बी.डी.डी.(ना.म.जोशी मार्ग)